महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
**ठाणे शहर**

क्र.पोउपआ/वा.विभाग/प्रशा.१/ २४ /२०१६
पोलीस उपायुक्त, वाहतुक विभाग,यांचे कार्यालय
ठाणे शहर, दिनांक :— ०७ /०३/२०१६

## " वाहतुक नियंत्रण अधिसुचना "

शासकीय कामानिमित्त चंदनवाडी, पाचपाखाडी येथील ठाणे महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयात दररोज हजारो नागरिकांची ये—जा सुरु असते. त्यामुळे याठिकाणी येणा—या वाहनांमुळे आजुबाजुच्या परिसरात वाहतुक कोंडी होउन त्याचा त्रास सर्वसामान्य नागरिकांना होतो. याव्यतिरिक्त या ठिकाणी होणारी राजकिय / सामाजिक आंदोलने , त्यातुन उद्‌भवलेल्या कायदा व सुव्यवस्थेच्या घटना तसेच आजुबाजुच्या नागरिकांची सुविधा विचारात घेता महापालिकेच्या बाहेरील परिसरात २४ x ७ किमान दोन रुग्णवाहिका तैनात असणे आवश्यक आहे. या बाबींचा विचारात करुन आमजनतेच्या सोईसाठी ,

मी डॉ.रश्मी करंदीकर, पोलीस उपायुक्त,वाहतूक विभाग,ठाणे शहर, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग एम.व्ही.ए. —११६/सी.आर/३७/टी.आर. दि.०७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार, मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून, खालील प्रमाणे वाहतूक नियंत्रण अधिसुचना जारी करीत आहे.

**ठाणे महानगरपालिकेचे मुख्य कार्यालयाच्या बाहेरील चंदनवाडी ते जनरल अरूण कुमार वैद्य पुतळयाचे बाजूस गेलेल्या मार्गावर ठा.म.पा. कार्यालयाचे कंपाउन्ड पर्यंत गेट नं. २ व ३ चे बाजूस तसेच कचराळी तलावाचे गेट पासून गणपती मंदिरा पर्यंतच्या रोडचे दोन्ही बाजूस सर्व प्रकारच्या वाहनासाठी नो पार्किंग करण्यात येत आहे. या मार्गावर दोन रुग्णवाहिका २४ x ७ तैनात करण्याची मुभा देण्यात येत आहे.**

सदरची वाहतुक अधिसुचना प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून ३० दिवस प्रायोगिक तत्वावर लागु करण्यात येत असून कोणाची काही सुचना अगर हरकती असल्यास, त्या लेखी स्वरूपात पोलीस उपायुक्त कार्यालय, वाहतुक विभाग, तीन हात नाका, ठाणे ४००६०२ येथे पाठवाव्यात. या अधिसुचने बाबत काही सुचना अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदरची अधिसुचना कायम स्वरूपात अंमलात राहिल.

सदरची अधिसुचना ही अग्निशामक दलाची वाहने, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागु राहणार नाही.

( डॉ.रश्मी करंदीकर )
पोलीस उपायुक्त,वाहतुक विभाग,
ठाणे शहर

प्रति,
जिल्हा प्रसिध्दी अधिकारी,ठाणे
२/— कृपया त्यांनी याबाबतची प्रसिध्दि द्यावी.

**प्रत माहितीसाठी :—**
मा.जिल्हाधिकारी, ठाणे.
मा.आयुक्त, ठाणे महानगरपालीका ठाणे. / मा.पोलीस आयुक्त, ठाणे शहर.
पोलीस उपायुक्त, विशेष शाखा/परिमंडळ—१,ठाणे.
परिवहन अधिकारी, ठाणे महानगरपालीका ठाणे
विभाग नियंत्रक अधिकारी, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
प्रभारी अधिकारी, मुख्य नियंत्रण कक्ष / वाहतुक नियंत्रण कक्ष, ठाणे शहर

प्रत:— समन्वय अधिकारी ९ अे.एस.कक्ष,पोलीस
२/— कृपया त्यांनी याबाबतची प्रसिध्दि पोलीस पत्रकात द्यावी.

महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

**ठाणे शहर**

क्र.पोउपा/वाहतुक/अधिसुचना/ ०८ /२०१७
पोलीस उपआयुक्त शहर वाहतुक शाखा यांचे कार्यालय
ठाणे. दि. १७ /०२/२०१७

## ''वाहतुक नियंत्रण अधिसुचना''

नौपाडा राम मारूती रोडवर गजानन महाराज मंदिर असुन तेथे दिनांक १६/०२/२०१७ ते दि. १८/०२/२०१७ या कालावधीत गजानन महाराज प्रगट दिन सोहळा कार्यक्रमानित्त मोठया प्रमाणाम भाविकांची गर्दी होत असते. त्या काळात गजानन महाराज चौक व राम मारूती रोडवरील वाहतुक कोंडी टाळण्यासाठी व वाहतुक सुरळीत होणे करीता आम जनतेच्या सोईसाठी

महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.११६/सीआर/३७/टीआर, दिनांक २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६ (१)(अ)(ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून मी संदीप भा. पालवे, पोलीस उप आयुक्त, शहर वाहतुक शाखा, ठाणे खालीलप्रमाणे वाहतुक नियंत्रण अधिसुचना जारी करीत आहे :–

**सदरची अधिसुचना दिनांक १८/०२/२०१७ रोजी सकाळी ०६.०० वा ते २३.०० वा पर्यन्त अमलात राहील**

१) वंदना टी पॉईटकडुन येणा–या व गजानन चौकातुन राम मारूती रोडने ठाणे स्टेशन, तलावपाळी कडे तसेच गोखले रोडने स्टेशन बाजुस जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांस **गजानन महाराज चौकात प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग :–** सदरची सर्व प्रकारची वाहने गजानन चौकातुन डाव्या बाजुने दगडी शाळा चौकातुन अथवा उजव्या बाजुने तीन पेट्रोलपंप मार्गे इच्छित स्थळी जातील.

२) तलावपाळी गडकरी सर्कल बाजुकडुन गजानन चौक मार्गे राम मारूती रोडने स्टेशन कडे अथवा तीन पेट्रोल पंप बाजुस जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांस दगडी शाळा चौक येथुन प्रवेश बंद करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग :–** सदरची वाहने दगडी शाळा चौक येथुन उजव्या बाजुस वळुन अल्मेडा चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

३) राम मारूती रोड गाडगीळ ज्वेलर्स समोरील चौकातुन गजानन महाराज चौकाकडे येणा–या सर्व प्रकारच्या वाहनांस गाडगीळ ज्वेलर्स चौकात प्रवेश बंद करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग :–** सदरची वाहने गाडगीळ ज्वेलर्स चौकातुन उजवीकडे नमस्कार हॉटेल बाजुस अथवा डावीकडे वळुन श्रध्दा वडापाव सेंटर मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतुक अधिसुचना ही पोलीस वाहने,फायर ब्रिगेड,रूग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहने यांना लागु रहाणार नाही

( संदीप भा. पालवे )
पोलीस उप आयुक्त, शहर वाहतुक शाखा
ठाणे.

प्रति,

जिल्हा प्रसिध्द अधिकारी, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी :–**

जिल्हाधिकारी, ठाणे. / आयुक्त, ठाणे महानगरपालीका ठाणे.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा/परिमंडळ–१/परिमंडळ–५
परिवहन अधिकारी ठाणे महानगरपालीका ठाणे

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे शहर
२/– त्यांनी याबाबतची प्रसिध्दि पोलीस पत्रकात द्यावी.